# राज्य निवडणूक आयोग
## महाराष्ट्र

१ ला माळा, नवीन प्रशासकीय भवन, हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग, मुंबई- ४०० ०३२.


---

(प्रसिद्धिपत्रक) दि. २७ मे २०१७.

**ग्रामपंचायत निवडणुकीसाठी**
**अंदाजे ७९ टक्के मतदान**

मुंबई, दि. २७: राज्यातील विविध १४ जिल्ह्यांतील जून ते सप्टेंबर २०१७ या कालावधीत मुदत संपणाऱ्या ५५ ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक, तसेच २५ जिल्ह्यांतील २९० ग्रामपंचायतींच्या रिक्त पदांच्या पोट निवडणुकांसाठी आज प्राथमिक अंदाजानुसार सरासरी ७९ टक्के मतदान झाल्याची माहिती राज्य निवडणूक आयुक्त ज. स. सहारिया यांनी आज येथे दिली.

श्री. सहारिया यांनी सांगितले की, सर्वत्र सकाळी ७.३० वाजता मतदानास सुरवात झाली. उन्हाची तीव्रता लक्षात घेऊन गडचिरोली जिल्हा वगळता अन्य सर्व जिल्ह्यांत सायंकाळी ५.३० ऐवजी ६.३० वाजेपर्यंत मतदानाची वेळ वाढवून देण्यात आली होती. गडचिरोली जिल्ह्यात केवळ दुपारी ३ पर्यंत मतदानाची वेळ होती. सर्व ठिकाणी मतदान प्रक्रिया सुरळीत व शांततेत पार पडली असून मतमोजणी २९ मे २०१७ रोजी होईल.
सार्वत्रिक निवडणुका झालेल्या जिल्हानिहाय ग्रामपंचायतींची संख्या अशी: ठाणे- २, पालघर- २५, नाशिक- ४, अहमदनगर- १, पुणे- ७, सातारा- ४, सोलापूर- ३, सांगली- १, औरंगाबाद- १, नांदेड- २, उस्मानाबाद- १, जालना- २, वाशीम- १ व चंद्रपूर- १. एकूण- ५५.

**पोट निवडणुका झालेल्या जिल्हानिहाय ग्रामपंचायतींची संख्या अशी:** ठाणे- १३, पालघर- ६, रायगड- ८, रत्नागिरी- ६, सिंधुदुर्ग- ३, नाशिक- २७, जळगाव- १८, नंदुरबार- ६, अहमदनगर- ११, पुणे- ३२, सातारा- ११, सांगली- १२, कोल्हापूर- १०, औरंगाबाद- १४, नांदेड- १५, उस्मानाबाद- ७, जालना- १९, लातूर- ३, अमरावती- १४, बुलडाणा- १६, नागपूर- ८, वर्धा- १०, चंद्रपूर- ११, भंडारा- ८ व गडचिरोली- २. एकूण- २९०.

0-0-0